# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र






०७१८४ - २५४७०२ sp.bhandara@gov.in / pilcb.bhandara@gov.in



जा.क्र. जनसंपर्क कक्ष/वार्तापत्र/ ५७५/पोलीस अधिक्ष,क कार्यालय भंडारा, दिनांकः- २६ /१०/२०१८


## "खुनाच्या गुन्हयात आरोपीस आजन्म कारावास व द्रंव्यदंडाची शिक्षा"

पोलीस ठाणे लाखांदुर अंतर्गत मौजा विरली/ बुज. येथील ईसम नामे पंढरी श्रीराम राउत, वय ३५ रा. विरली बु. ता. लाखांदुर जिल्हा भंडारा याने सहकारी नामे पुंडलिक बाळाजी बागडे यास गळा आवळुन खुन केल्याचा आरोप सिध्द् झाल्याने आज दिनांक २६/१०/२०१८ रोजी जिल्हा व सत्र न्यायालय, भंडारा चे अतिरीक्त सत्र न्यायाधिश श्री. आर. पी. पांडे सा. यांनी गुन्हयातील आरोपी पंढरी राउत यास आजन्म सश्रम कारावास व १०,०००/–रू. द्रव्यदंडाची शिक्षा ठोठावली.

याबाबत अधिक माहिती अशी आहे की, दिनांक २६/१२/१३ ला तक्रारदार लिलाधर विठ्ठल खानोरकर, वय ४५ वर्ष रा. विरली /बु. यांनी पोलीस ठाणे लाखांदुर येथे येवुन तोंडी तक्रार दिली की, चुलत भाउ पुंडलीक बागडे हा गावातीलच पंढरी श्रीराम राउत याची शेती बटईने करीत असुन त्याच शेतातील धानाचा चुरणा करण्याकरीता पंढरी राउत सह दिनांक २५.१२.२०१३ रोजी चुरणा करणारी मशिन शेतावर घेवुन जावुन सायंकाळ ६.०० वा. पर्यत चुरणा केला. दिनांक २६.१२.२०१३ रोजी सकाळी तक्रारदार हे शेतावर गेले असता पुंडलीक बागडे याचे प्रेत शेतात पडले दिसले व त्याचा गळा आवळुन पंढरी राउत यानेच खुन केला असल्याचे संशय व्यक्त करून तक्रार दिले वरून अपराध क्रमांक ११४/१३ कलम ३०२ भा.द.वी. अन्वये गुन्हा नोंदवुन गुन्हयाचा तपास पोलीस उपनिरीक्षक महादेव सिडाम यांनी सुरू केला व संशयीत आरोपी पंढरी श्रीराम राउत यास ताब्यात घेवुन तपासणी केली असता तपासात निष्पन्न झाले की, मृतक पुंडलीक बागडे हा पंढरी राउत यांचे वर पत्नी सोबत अनैतीक संबंध आहेत असा संशय करून बदनामी करतो असा राग ठेवुन दिनांक दिनांक २५.१२.२०१३ रोजी शेतातील धान चुरणा झाले नंतर पंढरी राउत याने पुंडलीक बोगडे यास खुप जास्त दारू पाजुन शेतावर आपले मोटार सायकलने घेवुन घेवुन गेला व शेतावरच रात्रर ८.०० वा. सुमारास पुंडलीक बागडे याचे गळात असलेल्या दुपट्याने पुंडलींक बागडेचा गळा आवळुन खुन केल्याचे निष्पन्न झाले.

गुन्हयाचे तपास पोलीस उपनिरीक्षक महादेव सिडाम यांनी **आरोपी नामे पंढरी श्रीराम राऊत, वय ३५ वर्ष रा. विरली / बु. जि. भंडारा** यास अटक करून गुन्हयाचा तपास केला तपासात आरोपी विरूध्द् योग्य व सबळ पुरावे प्राप्त झाल्याने आरोपी विरूध्द् गुन्हयात कलम ३०२ भा.द.वी अन्वये आरोप पत्र तयार करून सत्र न्यायालय भंडारा येथे दाखल केले. सदर आरोपपत्रास केस. क्र. २९/१४ अन्वये अतिरीक्त सत्र न्यायाधिश सा. यांचे समक्ष सुनावणी करिता ठेवण्यात आले

सदर गुन्हयाची सुनावणी **मा. अतिरिक्त सत्र न्यायाधिश श्री. आर. पी. पांडे सा.** यांचे समक्ष चालली गुन्हयात सरकार पक्षातर्फे **ॲडव्होकेट श्री प्रमोद भुजाडे, सहा. सरकारी अभियोक्ता**, सत्र न्यायालय भंडारा यांनी योग्य बाजु मांडुन साक्षदार तपासले. आज दिनांक २६.१०.२०१८ रोजी गुन्हयाचे स्वरूप व गंभिरता लक्षात घेवुन **आरोपी नामे पंढरी श्रीराम राऊत, वय ३५ वर्ष, रा. विरली/बुज त. लाखांदुर जि.** भंडारा यांचे विरूध्द दोषसिध्द झाल्याने **कलम ३०२ भादवि अन्वये आजीवन कारावास व १०,०००/—रु. दंड, दंड न भरल्यास एक वर्ष कारावासाची अशी शिक्षा ठोठावण्यात आली**. सदर गुन्हयात पोलीस निरीक्षक निशांत मेश्राम, ठाणेदार लाखांदुर यांचे मार्गदर्शनात पोउपनि. एम. डी. सिडाम तपासी अधिकारी म्हणुन तर पो.हवा. सुरेख भलावी–/८६ पो.स्टे. लाखांदुर यांनी योग्य पैरवी अधिकारी म्हणुन कामकाज केले.

( जितेंद्र के. आडोळे)
पोलीस उप निरीक्षक,
जनसंपर्क अधिकारी
संपर्क क्र. ९४०३१०९७२०

**प्रति,**

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत:** संगणक कक्ष, भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.